अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब
शपथेवर सत्य निवेदन करतो की,
माझे नावः किशोर यमाजी तरोणे
वयः ५४ वर्ष, धंदाः डी.वाय.एस.पी. लाचलुचपत कार्यालय, नांदेड
राहणारः लातूर

**सरतपास सरकारपक्षातर्फे सौ. एस.एन. चव्हाण, सहाय्यक सरकारी अभियोक्ताः–**

१. दि.१८/०४/२०२० रोजी मी विवेकांनद पोलीस स्टेशनमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक होतो. मी सचिन नाडागुडे यांना ओळखतो. मी दि.१८/०४/२०२० रोजी संध्याकाळच्या वेळी पेट्रोलिंग करीत होतो. त्यानंतर चार्ली नंबर ६ वरुन नाडागुडे यांनी वॉकीटॉकीवरुन सांगितले की, ताजोनद्दीबाबा रोडवर दगडफेक झाली आहे. त्यामुळे आम्ही सर्व तेथे रवाना झालो. त्यावेळेस कोव्हीडच काळ होता. तेथे नाडागुडे व त्याच्यासोबतच्या लोकांनी सांगितले की, येथे का बसता म्हणून कांही लोकांना हटकले असता त्यांनी पोलीसांवर दगडफेक केली. पोलीसांना मार लागला होता. त्यानंतर आम्ही त्या भागात शोध घेतला असता चार लोक मिळून आले. एकूण आरोपी पाच होते. पाचवा मिळून आला नव्हता. ज्या चार लोकांना पकडले होते त्यांना बघितल्यास ओळखू शकतो. साक्षीदार यांनी समोर बसलेल्या पाच आरोपींपैकी चार आरोपींना ओळखले. त्यांची नावे न्यायालयाने विचारली असता शशीकांत, अक्तर, शुभम व शंकर अशी आहेत. आरोपींनी दगडफेक केल्यामुळे पोलीसांच्या कामात अडथळा निर्माण झाला होता. तसेच जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन केले होते.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे ॲडव्होकेट श्री. एम. आय. शेख</u>**

२. मला अंदाजे पावणे दहाच्या सुमारास दगडफेकीच्या घटनेसंबंधी कॉल आला होता. त्यावेळी मी पेट्रोलिंग करीत होता. नक्की कोणत्या ठिकाणी होतो ते आता सांगता येणार नाही. आम्ही दहा मिनिटामध्ये घटनास्थळी पोहचलो होतो. विवेकानंद चौक पोलीस स्टेशनपासून घटनास्थळ हे ८०० ते ९०० फूट अंतरावर होते. घटनास्थळी एकूण किती पोलीस पोहचले होते ते आता नक्की सांगता येणार नाही. आम्ही अर्धा ते पाऊण तास शोध मोहिम घेतली. कुणाकुणाकडे चौकशी केली हे सांगता येणार नाही. कोरोनाच्या काळात पोलीसाची गाडी आल्यावर लोक घाबरुन घरी निघून जातात तसेच कांही लोक थांबतात ही. तपासिक अंमलदाराने माझा जबाब त्याचदिवशी घेतला. हे म्हणणे खरे नाही की, नाडागुडे सांगतात त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, विनाकारण आरोपींना खोटया गुन्हायात गोवण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नाडागुडे यांना मदत व्हावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे ॲडव्होकेट श्री.एस.एल. चव्हाण</u>**

३. घटनेबद्दलची माहिती माझी ऐकिव माहिती आहे. मी प्रत्यक्ष घटना पाहिलेली नव्हती.

**<u>उलटतपास आरोपी क्र.३ ते ५ तर्फे ॲडव्होकेट श्री.प्रतिक कांबळे</u>**

४. जेंव्हा वॉकीटॉकीवरुन नाडागुडे यांनी घटनेची माहिती दिली त्यावेळी त्यांनी कोणत्याही आरोपींचे नाव सांगितले नव्हते. त्यावेळी आरोपीचा शोध घेतल्यावर आणि त्यांना पकडल्यावर इतर लोकांकडे चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात जे सांगितले आहे ते खोटे सांगितले आहे

आणि मी आरोपींना पूर्वी बघितले नव्हते.  ( बाकीचा आरोपी क्र.१ व २ तर्फे झालेला उलटतपास स्वीकारला )

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIDYADHAR SHESHARAO MORE
Date: 2026.05.11 16:31:14 +0530

( विद्याधर शे. मोरे )

दिनांक :–११/०५/२०२६

अतिरिक्त सत्र न्यायाधीश–१

लातूर